# VASANTDADA PATIL PRATISHTHAN'S
## COLLEGE OF ENGINEERING AND VISUAL ARTS

Approved by AICTE, Govt. of Maharashtra, DTE, DOA & Affiliated to University of Mumbai
|| NAAC Accredited with "A" Grade || || ISO 9001:2015 Certified Institute ||
|| NBA Accredited Programs: COMP. ENGG./I.T. ||

Office : Vasantdada Patil Educational Complex, Eastern Express Highway, Padmabhushan Vasantdada Patil Marg, Sion, Mumbai - 400 022.
Mob.: +91 - 91372 24047 | E-mail : principal@pvppcoe.ac.in | Web: www.pvppcoe.ac.in


VPPCOE&VA/Scholarship/2025-26/ 604 Date:-.09/06/2025

# नोटीस

**<u>महाडिबीटी पोर्टलवरील Right To Give UP या बटणावर क्लिक (ok) न करणेबाबत</u>.**

संस्थेतीत महाडीबीटी पोर्टलवर अर्ज भरणाऱ्या विद्यार्थ्यांना (EBC, EWS, SEBC, SC, ST, VJNT, SBC, OBC,Minority) सदर नोटीसाद्वारे कळविण्यात येते की, सामान्य प्रशासन विभाग यांचा दिनांक ०३ जानेवारी २०२४ च्या शासन निर्णय नुसार महाडीबीटी पोर्टलवर Right To Give UP हे बटन २०२३ या वर्षापासुन नव्याने अद्यावत करण्यात आले आहे. या बटणावर क्लिक केल्यास या बटनाचा अर्थ असा आहे की, तुम्हाला कायमचा शिष्यवृत्ती योजनेचा लाभ नको आहे. आणि तुम्ही तुमच्या अभ्यासक्रमाच्या कालावधीत तुम्ही निवडलेल्या योजनेला अर्ज करू शकणार नाही. जर तुम्हाला स्कॉलरशिप नको असल्यास या बटनावर क्लिक करावे अन्यथा करू नये.

Dear Applicant, As per Govt.GR no साप्रवि २०२३/प्र क्र६२/ से १/३९ dated 03 Jan.2024. If you decide to choose the option to give up the subsidy, please be aware that your application will be given up, and you will not be able to apply for this scheme throughout your course duration. If you wish to permanently stop or give up the benefit of the scholarship, then only click on the OK button only otherwise NO."

तरी सर्व विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येत आहे की कोणीही **Right To Give UP** बटणावर क्लिक करू नये जर का आपण चुकूनही Right To Give UP या बटनावर क्लिक केल्यामुळे शिष्यवृत्तीपासून वंचित राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी विद्यार्थी, पालकांची राहील याची गांभीर्याने नोंद घेण्यात यावी.

V.P.P COLLEGE OF ENGG. & VA SION MUMBAI 400022.

(डॉ.आलम एन शेख)
Principal
प्राचार्य
Vasantdada Patil Pratishthan's College of Engineering and Visual Arts
Sion, Chunabhatti, Mumbai-400 022

सोबत: शासन निर्णय no-39. january 03,2024

मंत्रालयीन विभाग आणि त्याच्या अधिनस्त कार्यालयातील महाडीबीटी पोर्टलवर कार्यान्वित असलेल्या व प्रस्तावित सर्व योजनांमध्ये Give It Up Subsidy पर्यायाचे बटण लागू करणेबाबत....

# महाराष्ट्र शासन

## सामान्य प्रशासन विभाग

**शासन निर्णय क्रमांक: साप्रवि- २०२३/प्र.क्र.६२/से-१/३९**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक- ०३ जानेवारी, २०२४

**<u>संदर्भ</u>** :- सामान्य प्रशासन विभाग (मातं), शासन निर्णय क्र.मातंसं-२०१८/प्र.क्र.१३८/से-१/३९, दि. १२ ऑक्टोबर, २०१८.

**<u>प्रस्तावना</u>:-**

राज्य शासनाच्या विविध योजनांचा आर्थिक लाभ पात्र लाभार्थ्यांना पोहचविण्याकरिता महाआयटी मार्फत महाडीबीटी हे पोर्टल विकसीत केले आहे. महाडीबीटी पोर्टलचा उद्देश शासनाच्या विविध विभागांना त्यांच्या अंतर्गत येणाऱ्या योजना राबविण्यासाठी ऑनलाईन पद्धतीचे व्यासपीठ उपलब्ध करुन देणे हा आहे. याद्वारे लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात लाभांचे थेटपणे वितरण केले जाते.

सध्यस्थितीत राज्यातील शेतकरी, उद्योजक, विधवा, परित्यक्त्या, पुरबाधित, भूकंपग्रस्त इ. घटकातील लाभार्थ्यांना शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून जे लाभ/मदत देण्यात येते, अशा लाभार्थ्यांमधून शासनाच्या विहित नियमानुसार पात्र नसणारे लाभार्थी (उदा. आर्थिकदृष्ट्या सक्षम घटक) यांना वगळणे/लाभ नाकारणे तसेच केंद्र शासनाने राबविलेल्या Give It Up LPG Subsidy या उपक्रमाप्रमाणे नागरिकांना लाभ नाकारण्याचा पर्याय उपलब्ध करुन देणेबाबतचा प्रस्ताव राज्य शासनाच्या विचाराधीन होता. याबाबत शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**<u>शासन निर्णय</u> :-**

मा.उपमुख्यमंत्री (वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली दि. २३ ऑगस्ट, २०२३ रोजी आयोजित बैठकीमध्ये दिलेल्या निर्देशानुसार Give It Up Subsidy या केंद्र शासनाच्या उपक्रमाप्रमाणेच राज्य शासनातील महाडीबीटी पोर्टलवर कार्यान्वित असलेल्या योजनांसाठी Give It Up Subsidy उपक्रम राबविण्यात येईल. सध्यस्थितीत मंत्रालयीन विभाग आणि त्यांच्या अधिनस्त कार्यालयातील महाडीबीटी पोर्टलवर कार्यान्वित असलेल्या सर्व ६५ योजनांमध्ये, तसेच भविष्यात महाडीबीटी पोर्टलवर कार्यान्वीत होणाऱ्या सर्व योजनांकरीता Give It Up Subsidy पर्यायाचे बटण/पर्याय महाआयटीमार्फत विकसीत करुन संबंधित योजनांसाठी अर्जप्रक्रिया सुरु झाल्यानंतर अर्जदाराने Give It Up Subsidy बटण/पर्याय निवड केल्यानंतर प्रस्तूत पर्याय निवडीबाबतच्या खात्रीकरीता pop-up window मध्ये सूचना येईल. सदर सूचना मान्य केल्यानंतर अर्जदारास मोबाईलवर OTP प्राप्त होऊन, सदर OTP अर्जदाराने वेबसाईटवर नोंदविल्यानंतर Give It Up Subsidy ची प्रक्रिया पूर्ण होईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२४०१०३१६४११११३८०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

AMBADAS SAHEBRAO CHANDANSHIVE

Digitally signed by AMBADAS SAHEBRAO CHANDANSHIVE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT,
2.5.4.20=8ec4809bf7e642ce22fdacb42a63ca8410ade167476ac90f3c879facbf715a09, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=462D06A8B0C3DF3A0B3C93FE66F4DBA55913CE3FEBB0F6CDDF9D398D85D7377C, cn=AMBADAS SAHEBRAO CHANDANSHIVE
Date: 2024.01.03 16:40:16 +05'30'

(अं.सा. चंदनशिवे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१) मा. राज्यपालांचे सचिव
२) मा. मुख्यमंत्र्याचे सचिव, महाराष्ट्र शासन
३) मा. उपमुख्यमंत्री(वित्त व नियोजन), महाराष्ट्र शासन
४) मा. उपमुख्यमंत्री(गृह), महाराष्ट्र शासन
५) मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६) मा. मुख्य सचिवांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई
७) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,मंत्रालय, मुंबई
८) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
९) महालेखापाल १/२, लेखा व अनुज्ञेयता महाराष्ट्र, मुंबई/नागपूर
१०) महालेखापाल १/२, लेखा व परिक्षा महाराष्ट्र, मुंबई / नागपूर
११) सर्व विभागीय आयुक्त, महाराष्ट्र राज्य,
१२) सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य,
१३) सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
१४) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य,
१५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१६) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
१७) सर्व विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख
१८) निवड नस्ती